**अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्र / दाव्याची तपासणी करण्याबाबत मार्गदर्शक सुचना.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : लवेसू -२००७/प्र.क्र.७४/मावक -५**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २२ ऑगस्ट, २००७.**

**वाचा:-** १) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्रमांक:- सीबीसी-१०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दि. ३ .६. १९९६.
२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग
क्रमांक:-सीबीसी-१२-२०००/२५२/प्र.क्र.१/इमाव -५, दि.२५.१.२०००
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:- सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/मावक-५, दि. १.११.२००१
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:- सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दि. १६.५.२००७

**प्रस्तावना:-** मा. सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, जि. ठाणे व इतर या प्रकरणी दिनांक २.९.१९९४ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन अनुसूचित जाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्र/ दाव्याची तपासणी करुन वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी राज्यामध्ये विभागीय स्तरावर विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांमार्फत शैक्षणिक, सेवाविषयक आणि निवडणूक विषयक उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते. राज्यामध्ये जाती प्रमाणपत्र समित्यांकडे बरीचशी प्रकरणे प्रलंबित असल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या, शासकीय कर्मचा-यांच्या व लोकप्रतिनिधींच्या भवितव्याबाबत प्रश्न निर्माण झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यास अनुसरुन अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्गातील व्यक्तींच्या जातीच्या प्रमाणपत्राची / दाव्यांची पडताळणी करण्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्गातील व्यक्तींच्या जातीच्या प्रमाणपत्राची / दाव्यांची पडताळणी करतांना ज्या कुटुंबातील वडील, सख्खे भाऊ किंवा बहिण अशा जवळच्या रक्ताचे नाते (Father's family tree with blood relation.) असलेल्यांपैकी कोणाचेही जाती वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate issued by appropriate authority) असेल तर सदर प्रमाणपत्राच्या आधारे अशा कुटुंबातील इतर व्यक्तींनी वैधता प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केल्यास त्यांना (रक्ताच्या नात्याचे कुटुंबातील नातेवाईक उदा. वडील, मुलगा, मुलगी, भाऊ, बहिण) वैधता प्रमाणपत्र देतांना
इतर कोणत्याही पुराव्यांची मागणी करण्यात येऊ नये व अशा प्रस्तावांची तपासणी पडताळणी समितीकडे प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून **एक महिन्याच्या आत** करावी.



Scanned with CamScanner

३. जेथे नाम सादृश्य आहे, परंतु रक्ताचे नातेसंबंध नाहीत, अशी प्रकरणे समितीच्या निदर्शनास आली तर समितीचे समाधान होईपर्यंत पुरावे मागण्याचा समितीचा अधिकार अबाधित राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २००७०८२२१५०१२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-

**(रमेश म. उबाळे)**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव,

मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

मा. विरोधी पक्ष नेते, विधान सभा, विधान भवन, मुंबई.

मा. विरोधी पक्ष नेते, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.

प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

सर्व विभागीय आयुक्त

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई / नगापूर / औरंगाबाद.

*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई / नगापूर / औरंगाबाद.

सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेश त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणून द्यावेत.

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक / प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी

सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी, सर्व विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या १ व २, विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपुर, अमरावती, लातुर

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी /सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

आयुक्त, सर्व महानगर पालिका

मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका

सर्व कार्यासन, सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner

*यांना विनंती की, त्यांनी सदर परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी द्यावी.*
*निवड नस्ती, का मावक-५*
** पत्राद्वारे.*



Scanned with CamScanner